| | |
|---|---|
| **MHLA050017382025** | दाखल दिनांक : - ०५/०२/२०२५<br>नोंदणी दिनांक : - ०५/०२/२०२५<br>निकाल दिनांक :- ०४/०५/२०२६<br>कालावधी:-**०१ वर्षे, ०२ महिने,२९दिवस** |

**<u>अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी अहमदपूर, यांचे न्यायालयात.</u>**

**( पिठासीन अधिकारी - आर.डी. वाबळे )**

**(न्यायनिर्णय अधिघोषित दिनांक–०४.०५.२०२६)**

**<u>नियमित फौजदारी खटला क्रमांक.३३/२०२५</u>** **<u>निशाणी क्रमांक -२७</u>**

गुन्हा नोंद क्र.३३३/२०२४, पो. स्टे. किनगांव.

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष.** | | **महाराष्ट्र शासन,**<br>तर्फे पोलीस निरीक्षक,<br>पोलीस स्टेशन, किनगांव,<br>ता. अहमदपूर, जिल्हा लातूर. |
| **अभियोग पक्षा तर्फे.** | | सहाय्यक शासकिय अभियोक्ता श्री. ए.एन.काकडे |
| **आरोपी.** | | **१. श्रीनिवास गोविंद चिलमे,**<br>वय -२८ वर्षे, कामधंदा -मजूरी,<br>**२. मिरा गोविंद चिलमे,**<br>वय -४५ वर्षे, कामधंदा -मजूरी,<br>**३. गोविंद ज्ञानोबा चिलमे,**<br>वय -४९ वर्षे, कामधंदा -मजूरी,<br>सर्व रा.बुधोडा, ता.औसा, जि.लातूर |
| **आरोपी तर्फे विधीज्ञ.** | | श्री.ए.आर.नवटक्के |

**<u>भाग- ब</u>**

**<u>(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(ii)अन्वये)</u>**

| | | |
|---|---|---|
| फिर्याद दाखल दिनांक | | २८.१२.२०२४ |
| दोषारोप पत्र पाठविल्याचा दिनांक | | २८.०१.२०२५ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | | १३.०३.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | | १६.०४.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी राखूण ठेवल्याचा दि. | | ०४.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | | ०४.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षे संदर्भात आदेशाचा दिनांक | | निरंक, आरोपींची निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## आरोपीचा तपशील

| आरोपीं क्र. | आरोपींचे नावे | अटक दिनांक | जामिना वर सोडल्याचा दि. | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ. प्र. सं. क. ४२८ अन्वये समायोजीत (Set off) करणे बाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | **श्रीनिवास गोविंद चिलमे** | दि.०२.०१.२५ फौ.प्र.सं. कलम ३५(३)-अ प्रमाणे नोटीस | दि.१३.०३.२६ | भा.न्या.सं. कलम ८५,११५,३५२, ३५१(२) सह ३(५) | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| ०२ | **मिरा गोविंद चिलमे** | दि...२४ फौ.प्र.सं. कलम ४१-अ प्रमाणे नोटीस | दि.०५.०३.२६ | भा.न्या.सं. कलम ८५,११५,३५२, ३५१(२) सह ३(५) | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| ०३ | **गोविंद ज्ञानोबा चिलमे** | दि...२४ फौ.प्र.सं. कलम ४१-अ प्रमाणे नोटीस | दि.०५.०३.२६ | भा.न्या.सं. कलम ८५,११५,३५२, ३५१(२) सह ३(५) | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

## भाग- क
## (फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(iii)अन्वये)

| सा.क्र. | साक्षीदारांची नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| ०१ | **भाग्यश्री श्रीनिवास चिलमे** | फिर्यादी | **२३** |
| ०२ | **अरुण रामकिशन चोले** | साक्षीदार | **२५** |

### अभियोग पक्षातर्फे दाखल करण्यात आलेले दस्त

| द.क्र. | निशाणी | दस्त वर्णन |
|---|---|---|
| - | - | - |

### न्यायालया मार्फत निशाणी देण्यात आलेले दस्त

| द.क्र. | निशाणी | दस्त वर्णन |
|---|---|---|
| ०१ | दोषारोप पत्र | **०१** |
| ०२ | फेरीस्त | **०२** |

### बचाव पक्षाचा पुरावा

| द.क्र. | निशाणी | दस्त वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

### अभिलेखावरील मुद्देमाल

| म.क्र. | मुद्देमाल क्र. | दस्त वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## न्या य नि र्ण य

(पारीत दिनांक -०४/०५/२०२६)

प्रस्तुत प्रकरण आरोपींविरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ८५, ११५, ३५२, ३५१(२) सह ३(५) अंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयांसाठी चालविण्यात आले.

<u>**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे**</u> -

**०२.** फिर्यादी भाग्यश्री श्रीनिवास चिलमे यांनी अशी फिर्याद नोंदविली की, आरोपी क्र. ०१ श्रीनिवास तिचा पती आहे, आरोपी क्र.०२ मिरा ही तिची सासू आहे, आरोपी क्र. ०३ गोविंद हे सासरे आहेत, आरोपी क्र. ०४ ही नणंद आहे. फिर्यादी तिचे सासरी नांदत असताना आरोपींनी दि.१५-०६-२०२४ ते दि.०३-१०-२०२४ चे दरम्यान आपसात संगनमत करुन माहेरहुन ५ लाख रुपये आणण्यासाठी तिचा शारिरीक व मानसिक छळ केला व तिला घराबाहेर हाकलून दिले. म्हणून, फिर्यादीने किनगांव पोलीस ठाणे येथे फिर्याद नोंदविली.

**०३.** फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन, किनगांव यांनी आरोपींविरुध्द गुन्हा क्रमांक ३३३/२०२४ नोंदविला व पुढील तपास ए.एस.आय.काटापल्ले यांच्याकडे वर्ग करण्यात आला. तपासी अंमलदार यांनी तपासकामी घटनास्थळ पंचनामा केला व साक्षीदारांचे बयाण नोंदविले. तपासाअंती तपासि अंमलदार यांनी आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

**०४.** आरोपी क्र. ०४ मेघा ही दिनांक १८-११-२०२५ रोजी मयत झाली. त्यामुळे निशाणी क्र.०१ वर आदेश करुन तिच्या विरुद्ध प्रकरण बंद करण्यात आले.

**०५.** आरोपी क्र. १ ते ३ यांच्या विरुद्ध **निशाणी क्र.१५** वर दोषारोप नोंदवून तो त्यांना मराठीत वाचून व समजावून सांगितला. आरोपींनी गुन्हा नाकबूल करुन खटला चालविण्याची मागणी केली.

**०६.** अभियोग पक्षाचा पुरावा नोंदवून झाल्यानंतर सबळ पुरावा अभिलेखावर दिसून आला नसल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३-१(ब) अन्वये निवेदन न नोंदविता प्रकरण पुढे चालु ठेवले.

**०७.** प्रस्तुत खटल्याचे निर्णयार्थ खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारण मिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.१५/०६/२०२४ ते ०३/१०/२०२४ पर्यंत बुधोडा आणि वंजारवाडी, ता.अहमदपूर, जि.लातूर येथे तुम्ही आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीला माहेरहून पाच लाख रुपये घेऊन येण्याची बेकायदेशीर मागणी करुन सतत बेकायदेशीर मागण्यांच्या पुर्ततेकरीता फिर्यादीचा शारिरीक व मानसिक छळ केला व फिर्यादीस क्रूर वागणूक दिली, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | ...नकारार्थी |
| २. | वर नमुद कालावधीमध्ये व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन वर नमूद फिर्यादी यास लाथा बुक्क्यांनी ईच्छापूर्वक मारहाण करुन साधी दुखापत पोहोचविली, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | ...नकारार्थी |
| ३. | वर नमुद कालावधीमध्ये व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन वर नमूद फिर्यादीस जाणीवपूर्वक शिवीगाळ करुन अपमानित केले व सार्वजनिक शांततेचा भंग करण्यासाठी फिर्यादीस प्रक्षोभित केले, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | ...नकारार्थी |
| ४. | वर नमूद कालावधीमध्ये व ठिकाणी तुम्ही आरोपींनी आपसात संगनमत करुन वर नमूद फिर्यादी यास जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारीपात्र धाकदपटशा केला, असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | ...नकारार्थी |
| ५. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक ०१ ते ०४ बाबत :-**

**०८.** मुद्दे क्र.०१ ते ०४ हे एकमेकांशी संलग्न असून पुनरावृत्ती टाळण्याकरीता एकत्रीत चर्चीले आहेत.

**०९.** फिर्यादीच्या साक्षीचे अवलोकन करणे गरजेचे आहे. फिर्यादी साक्षीदार क्र.०१ भाग्यश्री चिलमे, यांनी त्यांच्या साक्षीत सांगितले की, आरोपींसोबत त्याचा किरकोळ वाद झाला होता. त्यांनी आरोपींविरुध्द तक्रार दिली होती. त्यांनी केवळ

त्यांची फिर्याद वरील सही मान्य केली, त्यातील मजकुर माहिती नसल्याचे कथन केले. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार भारतीय साक्षी पुरावा कायदा, कलम १५४ अन्वये फितूर घोषित करुन साक्षीदाराच्या न्यायालयाच्या परवानगीने सुचक प्रश्न विचारले असता साक्षीदाराने अभियोग पक्षास पुष्टी देणारी कथने नाकारली. सरतेशेवटी त्यांची न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे सांगून फिर्यादी याने अभियोग पक्षास मदत होईल, अशी कोणतीही बाब कथन केली नाही.

**१०.** साक्षीदार क्र.०२ अरुण चोले, यांनी त्यांच्या साक्षीत सांगितले की, आरोपींसोबत त्याच्या मुलीचा किरकोळ वाद झाला होता. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार भारतीय साक्षी पुरावा कायदा, कलम १५४ अन्वये फितूर घोषित करुन साक्षीदाराच्या न्यायालयाच्या परवानगीने सुचक प्रश्न विचारले असता साक्षीदाराने अभियोग पक्षास पुष्टी देणारी कथने नाकारली. सरतेशेवटी त्यांची न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे सांगून फिर्यादी याने अभियोग पक्षास मदत होईल, अशी कोणतीही बाब कथन केली नाही.

**११.** उपरोक्त पुराव्याच्या अवलोकनांती अभियोग पक्षावर असे दायित्व येते की, तथा कथित घटनेच्यावेळी आरोपीं लोकांनी संगनमत करुन फिर्यादीस माहेरहून पाच लाख रुपये घेऊन येण्याची बेकायदेशीर मागणी करुन सतत बेकायदेशीर मागण्यांच्या पुर्ततेकरीता फिर्यादीचा शारिरीक व मानसिक छळ केला व फिर्यादीस क्रूर वागणूक दिली, तसेच लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली, तसेच शिवीगाळ करून त्यांना प्रक्षोभीत करुन अपमानास्पद वागणुक दिली व जिवे मारण्याची धमकी दिली, हे सिध्द करावे.

**१२.** सर्वप्रथम अभियोग पक्षाने तथाकथित घटनेतील वेळ व तारीख सिध्द केली का, हे पाहणे गरजेचे आहे. फिर्यादीचे अवलोकन केले असता, याठिकाणी अभियोग पक्षाने नोंदवण्यात आलेले फिर्यादी हे अभियोग पक्षास सहकार्य करत नाहीत. सदर साक्षीदारांच्या व्यतिरीक्त घटनेच्या अनुषंगाने साक्षीदार किंवा तपासिक अधिकारी

यांची साक्ष नोंदवून घटनेची वेळ व तारीख सिध्द केली नाही.

**१३.** अभियोग पक्षाच्या कथना अन्वये फिर्यादीस माहेरहून पाच लाख रुपये घेऊन येण्याची बेकायदेशीर मागणी करुन सतत बेकायदेशीर मागण्यांच्या पुर्ततेकरीता फिर्यादीचा शारिरीक व मानसिक छळ केला व फिर्यादीस क्रूर वागणूक दिली, तसेच लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली, तसेच शिवीगाळ करून त्यांना प्रक्षोभीत करुन अपमानास्पद वागणुक दिली व जिवे मारण्याची धमकी दिली, असे त्यांच्या साक्षीत आले नाही. अभियोग पक्षाचे फिर्यादी हे अभियोग पक्षास सहकार्य करत नाहीत.

**१४.** अभियोग पक्षाच्या कथना अन्वये आरोपींनी आपसात संगनमत करुन समान उद्देशाचे पुरसरनार्थ फिर्यादीच्या हातून शांतता भंग किंवा अपराध घडवून आणण्याच्या उद्देशाने तिचा उद्देशपूर्वक अपमान केला व प्रक्षोभित केले. फिर्यादी व साक्षीदाराचे साक्षीचे अवलोकन केले असता, त्यांच्या साक्षीमध्ये असे कोठेही आले नाही की, आरोपींनी फिर्यादीचा अपमान केला व त्याला प्रक्षोभित केले व त्याद्वारे सार्वजनिक शांततेचा भंग झाला. उपरोक्त पुराव्यावरुन अभियोग पक्षाने ठोस, सबळ, विश्वासार्ह पुरावा देऊन आरोपींनी फिर्यादीस फौजदारीपात्र धाकदपटशा केला. त्याचप्रमाणे, सदरचे प्रकरण गैसमजुतीतून दाखल झाले असल्याने त्यांनी उभयतांमध्ये तडजोड करुन प्रकरण निकाली काढण्यास विनंती केली आहे. उभयता भविष्यातील त्यांचे संबंध चांगले रहावेत, या बाबींचा विचार करणे गरजेचे आहे.

**१५.** फौजदारी खटल्यामध्ये आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत होण्याकरीता गुन्ह्यांचा प्रत्येक टप्पा अभियोग पक्षाने सबळ व निर्विवाद पुराव्यामार्फत शक्यतेच्या पलिकडे जावून सिध्द करणे गरजेचे असते. या प्रकरणी अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले फिर्यादी यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. तसेच या प्रकरणात घटनास्थळ पंच व तपासिक अंमलदार यांची साक्ष नोंदविली नसल्यामुळे अभियोग पक्षाने याठिकाणी तथाकथित घटनेच्या वेळी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस माहेरहून

पाच लाख रुपये घेऊन येण्याची बेकायदेशीर मागणी करुन सतत बेकायदेशीर मागण्यांच्या पुर्ततेकरीता फिर्यादीचा शारिरीक व मानसिक छळ केला व फिर्यादीस क्रूर वागणूक दिली, तसेच लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली, तसेच शिवीगाळ करून त्यांना प्रक्षोभीत करुन अपमानास्पद वागणुक दिली व जिवे मारण्याची धमकी दिली, या बाबी अभियोग पक्षाने निःशंकपणे सबळ व ठोस पुरावा देऊन सिध्द केल्या नाहीत. त्यामुळे, **मी मुद्दे क्रमांक ०१ ते ०४ चे नकारार्थी** निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक ०५ बाबत:-**

**१६.** **मुद्दे क्रमांक ०१ ते ०४ चे उत्तर नकारार्थी** नोंदविण्यात आल्यामुळे व अभियोग पक्ष, आरोपींवरील दोषारोप निःसंशयपणे शाबीत करण्यात अपयशी ठरल्यामुळे आरोपीं हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहेः-

**-ः आ दे श ःः-**

**१.** आरोपी क्र.१ ते ३ यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ८५, ११५, ३५२, ३५१(२) सह ३(५) अंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२.** आरोपींचे जामीन बंधपत्रे व जातमुचलके रद्द करण्यात येतात.

**३.** आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ चे अनुपालनास्तव प्रत्येकी रुपये १५,०००/- चे जामीन बंधपत्र व जातमुचलका सादर करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर.)

Digitally signed by WABALE RAMDAS DAULAT
Date: 2026.05.04 16:47:13 +0530

स्थळ - अहमदपूर.
दिनांक -०४/०५/२०२६.

**(आर.डी. वाबळे)**
अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदपूर.